# संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र. अधि(कृषि)/शा.अ./४४८/२०२२ दि.१८/१०/२०२२

## परिपत्रक

विद्यापीठाने शेती कामाव्यतिरिक्त इतर कामांकरीता कंत्राटी तत्वावर बाहयस्त्रोतामार्फत मजूर/मनुष्यबळ पुरविणेसंबंधी येणाऱ्या संभाव्य अडचणींवर उपाययोजना म्हणून विविध कार्यालयांचे (सर्व शाखा, महाविद्यालये, वसतिगृह, ग्रंथालय, प्रयोगशाळा, जिमखाना इ.) तसेच विस्तार शिक्षण संचालनालय कार्यालयांतर्गत सर्व विभाग/कार्यालय व अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी कार्यालयांमधील कामांकरीता त्यांचे स्वरुप/रुपरेषा व मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याकरीता समिती गठीत करण्यात आली होती.

सदर समितीने सर्व संमतीने कंत्राटी तत्वावर बाहयस्त्रोतामार्फत मजूर/मनुष्यबळ पुरविणेसंबंधी येणाऱ्या संभाव्य अडचणींवर उपाययोजना म्हणून विविध कार्यालयाचे (सर्व शाखा, महाविद्यालय, वसतीगृह, ग्रंथालय, प्रयोगशाळा, जिमखाना इ.) तसेच विस्तार शिक्षण संचालनालय कार्यालयांतर्गत सर्व विभाग/कार्यालय व अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी कार्यालयांमधील कामांकरीता त्यांचे स्वरुप/रुपरेषा व मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहे.

या परिपत्रकासह सदर प्रारुप संलग्न करण्यात येत असून संबंधीत सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार सदर मार्गदर्शक तत्वांचा वापर करावा. तरी सर्व कार्यालय प्रमुखांना सुचित करण्यात येते की, सदर प्रारुप हे मार्गदर्शक स्वरुपाचे असून त्यात किमान वेतन कायदयानुसार आपले कार्यालय ज्या विभागामध्ये अंतर्भूत होत असेल त्या विभागाला लागू राहील याची त्यांनी नोंद घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर प्रक्रिया अवलंबतांना शासनाने याबाबत ठरवुन दिलेले मानके, अटी व शर्ती, कायदे विषयक नियमांचा भंग होणार नाही याची संपुर्ण दक्षता घ्यावी. तसेच विभागाने सदर प्रक्रीया राबवतांना सर्व बाबी काटेकोरपणे तपासुन कार्यवाही करावी जेणेकरून विद्यापीठाविरूध्द कोणतेही न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच सदर प्रक्रीया अवलंबताना निधीची उपलब्धता तपासण्याची/असण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधीत कार्यालय प्रमुखांची राहील.

**सोबत:** वरील प्रमाणे

**संचालक शिक्षण तथा**
**अधिष्ठाता (कृषि)**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**प्रतिलिपी:**

१. संचालक, विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना समादाराने माहीती तथा पुढील उचित कार्यवाहीस्तव.
२. अधिष्ठाता, कृषि अभियांत्रिकी शाखा, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीती तथा पुढील उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३. सहयोगी अधिष्ठाता/विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख (सर्व)....................................डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीती तथा पुढील उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
४. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना माहीतीकरीता अग्रेषित.
५. कुलगुरूंचे स्विय सहायक यांना मा. कुलगुरू महोदय, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांचे माहीतीकरीता.